दूरध्वनी क्र. २२६१८२६१

फॅक्स क्र. २२६१८२६२

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)
२३१,कॉमिसरीएट इमारत, तिसरा मजला, डीबीएस बॅकेजवळ, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१.
ई–मेल : mahacim.mumbai@gmail.com
वेबसाईट : www.mcimindia.org.in

डॉ. आशुतोष गुप्ता अध्यक्ष | डॉ. दत्तात्रय पाटील उपाध्यक्ष | डॉ. दिलीप वांगे प्रबंधक

जा.क्र. एमसीआयएम 960323९/२०१७ दि. 18 MAR 2017

प्रति,
मा. अतिरिक्त संचालक,
कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य,
पुणे

**विषय: म्हैसाळ येथील निंदनीय घटनेनंतर आरोग्य विभागाने रुग्णालय व दवाखाने तपासणी मोहिम सुरु केली आहे. त्यामध्ये आयुर्वेद व युनानी वैद्यकीय व्यवसायिकांना होणाऱ्या त्रासाविषयी**
**संदर्भ: राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. राकुकका/रुग्णालय तपासणी/१६७९० –१६८९६/कक्ष –८/ २०१७ दि. १३.०३.२०१७**

महोदया,

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांच्यामार्फत संपूर्ण राज्यातील रुग्णालय तपासणी धडक मोहिमेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, पोलीस अधिक्षक तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी व महानगरपालीकेचे अधिकारी यांची बैठक बोलाविण्यात येऊन महानगरपालिका क्षेत्र, शहरी व ग्रामीण भागामधील रुग्णालय तपासणी पथके तयार करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये आयुर्वेद व युनानी पदवीधारक व पदव्युत्तर पदवीधारकांना महाराष्ट्र शासनाच्या सन १९९२ चे परिपत्रक, सन १९९९ च्या शासन अधिसूचना आणि महाराष्ट्र विधिमंडळाने पारित केलेल्या महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम सुधारणा २०१४ मधील कलम २५ उपकलम ४ व ५ नुसार आयुर्वेद व युनानी वैद्यक शास्त्राबरोबरच आधुनिक वैद्यक (Allopathy) शास्त्राचा त्यांच्या प्रशिक्षणानुसार वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकार दिला आहे.

सन १९९९ च्या अधिसूचनेनुसार अन्न व औषध नियम १९४८ Secton 2-ee-iii च्या अधिनियमानुसार या वैद्यकीय व्यवसायिकांना **ANTIBIOTICS, ANAESTHESIA DRUGS, EMERGENCY MEDICINES** व सर्वप्रकारची आधुनिक (Allopathic) औषधे त्यांच्या त्यांच्या प्रशिक्षणानुसार (undergraduate/postgraduate speciality) वापरण्याची अधिकार दिला आहे. सदर अधिसूचना मा. सर्वोच्च न्यायालयातील डॉ. मुख्तियार चंद विरुद्ध पंजाब राज्य व इतर १९९८ (७ एस.सी.सी. ५७९) या खटल्यानुसार ग्राहय व मान्य करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र विधिमंडळाने या आयुर्वेद व युनानी पदवीधारकांना प्रदान केलेल्या आधुनिक वैद्यक (Allopathy) शास्त्राचा वापर करण्याच्या अधिकारांवर मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी अंतरिम स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला असून आयुर्वेद व युनानी वैद्यकीय व्यवसायिकांच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब केले असून सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे. या सर्व व्यवसायिकांना आधुनिक वैद्यक शास्त्र वापरण्याचा अधिकार असल्याबाबत धडक मोहिमेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनभिज्ञता काही ठिकाणी आढळून आली आहे. तरी या सर्व व्यवसायिकांना आधुनिक वैद्यक शास्त्र वापरण्याचे अधिकार असल्याबाबत सदर अधिकाऱ्यांना सूचित करण्यात यावे, हि नम्र विनंती.

महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत परिषद जिच्या अंतर्गत ८०,००० आयुर्वेद व युनानी पदवी व पदव्युत्तर पदवीधारक नोंदणीकृत आहेत. या सर्व वैद्यकीय व्यवसायिकांचा शहरी व विशेषतः ग्रामीण भागातील शासकीय, निमशासकीय व खाजगी आरोग्य सेवा तथा वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण, दुर्गम अदिवासी गरीब मागास आरोग्य व्यवस्थेचा ते कणा आहेत. N.R.H.M., EMS रुग्णवाहिका, RGBSY अशा विविध शासकीय योजनांमध्ये आणि राज्यातील दुर्गम ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालये येथेही त्यांचे महत्वाचे योगदान आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य रुग्णालय तपासणी मोहिमेच्या अंतर्गत येणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे व सार्वजनिक आरोग्य अधिकारी आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायिकांच्या आधुनिक चिकित्सा (Allopathy) पद्धतीच्या वापरासंबंधीच्या अधिकारांबाबत अनभिज्ञ आहेत. तसेच जाणुनबुजून काही अधिकारी आकसापोटी आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायिकांना लक्ष्य करुन त्यांना मानसिक त्रास देण्याची घटना घडण्याची शक्यता आहे. असे घडल्यास हा कायदेभंग मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरेल याकडे परिषद आपले नम्रपणे लक्ष वेधू इच्छिते.

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी तथा मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या Digital India व Digital Maharashtra च्या धोरणानुसार परिषदेच्या सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांच्या नोंदणीकरणाचे तथा नोंदणीच्या नूतनीकरणाच्या संदर्भातील अधिनियमात सुधारणा करण्या संदर्भातील महत्वपूर्ण शिफारसी शासनस्तरावर प्रस्तावित आहेत. सदर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सर्व नोंदणीकृत व्यवसायिकांच्या नोंदणीच्या नूतनीकरण संदर्भात निवेदन परिषदेने परिषदेच्या www.mcimindia.org.in या संकेतस्थळावर दि. ०७.०७.२०१६ व दि. १२.०८.२०१६ रोजी प्रसिद्ध केले आहे.

दूरध्वनी क्र: २२६१८२६१

फॅक्स क्र. २२६१८२६२

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

२३१,कॉमिसरीएट इमारत, तिसरा मजला, डीबीएस बॅंकेजवळ, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१.

ई–मेल : mahacim.mumbai@gmail.com वेबसाईट : www.mcimindia.org.in

डॉ. आशुतोष गुप्ता
अध्यक्ष

डॉ. दत्तात्रय पाटील
उपाध्यक्ष

डॉ. दिलीप वांगे
प्रबंधक

जा.क्र. एमसीआयएम/९७०३२३९/२०१७ दि. 18 MAR 2017

तरी आपणांस विनंती की, नोंदणी नूतनीकरणासाठी परिषदेच्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांना वेठीस धरण्यात येऊ नये. यासंदर्भात परिषदेच्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांचा कोणताही दोष नसून याबाबतची माहिती धडक मोहिमेतील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात यावी.

विविध प्रसार माध्यमांमधून आयुर्वेद व युनानी पदवीधारक वैद्यांच्या व्यवसायाच्या अधिकाराबद्दल चुकीची माहिती छापल्यामुळे समाजामध्ये साशंकता निर्माण होत आहे व त्यामुळे आयुर्वेद व युनानी पदवीधारकांची नाहक बदनामी होत आहे. आपणास विनंती की, सदर विषयी आपल्याद्वारे प्रसार माध्यमांद्वारे दिली जाणारी माहिती मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्णयानुसार योग्य असेल असे पहावे.

संपूर्ण राज्यातील रुग्णालय तपासणी धडक मोहिमेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, पोलीस अधिक्षक तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी व महानगरपालीकेचे अधिकारी यांची बैठक बोलाविण्यात येऊन महानगरपालिका क्षेत्र, शहरी व ग्रामीण भागामधील रुग्णालय तपासणी पथके तयार करण्यात आली आहेत. आपणांस विनंती आहे की, सदर पथकामध्ये महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन या परिषदेचे सदस्य/नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश करावा.

तरी आपण सदर विषयी लक्ष घालून आयुर्वेद व युनानी वैद्यक व्यवसायिकांच्या आधुनिक शास्त्रीय वैद्यक पद्धतीचा व्यवसाय (Allopathy) करणेचा अधिकार व इतर हक्कांविषयी संदिग्धता दूर व्हावी व अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांना त्यांच्या वैद्यक व्यवसायामध्ये पूर्णत्वाने व सक्षमतेने वैद्यकीय सेवा देण्यात अटकाव होवू नये, यासाठी आपण सदर विषयी लक्ष द्यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

आशुतोष गुप्ता

(डॉ. आशुतोष सतीश गुप्ता)
अध्यक्ष
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन,
मुंबई

प्रत: सविनय सादर

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
९. मा. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. मा. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१२. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१३. मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
१४. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५. मा. आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१६. मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१७. मा. पोलीस आयुक्त (सर्व)
१८. मा. पोलीस अधिक्षक (सर्व)
१९. सर्व मा. पदाधिकारी व मा. सदस्य, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई.